जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुणे/२००१ ७८९४६४५८

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 18 OCT 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे/ ~~सोलापूर/अहमदनगर~~
~~१. प्रशासन अधिकारी,~~
~~मनपा/नपा, प्राथमिक शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड, पुणे-१८/ता. बार्शी, जि. सोलापूर~~

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत, माध्यम - मराठी

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलस-१००० (१ )/प्राशि-३, दिनांक ३० ऑगस्ट, २००१ // ५५७/२००४

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे. | वाघोली जि. पुणे. | मराठी |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधीत - त्यांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
~~१४. संस्थेकडून ... प्राथमिक शाळा ... [illegible] ... माध्यमाची ... हमीपत्र संस्थेकडून ... करुन घेण्यात यावा.~~
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

स्वाक्षरीत [illegible]
सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रति,
सचिव/अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, ४८/१, एरंडवणा, पौड रस्ता, पुणे.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे
पत्र प्राप्त दिनांक : 24 OCT 2001
टेबल नं. ४

१३०२ २५/१०

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

**प्राथमिक विद्यालय, वाघोली**

ता. हवेली, जि.पुणे - ४१२ २०७. फोन : २७०५१२७७

शाळा मान्यता क्र. : व्ही.एल.एस्. १०००-५५७-२००० (१) प्रा.शि.०३ दि.३०.०८.२००१ शाळा यु-डायस नं. : २७२५०५०८६०४

ई-मेल : pri_wagholi @ pdeapune.org

जावक क्र. : समक्ष/2023-24 दिनांक : 24/11/23

' साक्षरता ते संगणक, निती ते इंटरनेट '

अध्यक्ष
अजित पवार

उपाध्यक्ष
राजेंद्र घाडगे

मानद सचिव
ॲड.संदीप कदम
अधिसभा सदस्य,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे

खजिनदार
ॲड. मोहनराव देशमुख

उपसचिव
एल. एम. पवार

मुख्याध्यापक
सौ. औटी एस. व्ही.

## शिक्षण उपसंचालक मान्यता आदेश मुळ प्रत नसल्याचे हमीपत्र

मी सौ.औटी सविता विवेक मुख्याध्यापिका , पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, प्राथमिक विद्यालय ,वाघोली ता.हवेली जि.पुणे हमीपत्र देते की, आमचे विद्यालयात इ.१ वी ते इ.४ थी अखेर वर्ग असून ४ तुकडया इतके आहेत. विद्यालयात तसेच संस्था कार्यालयाकडे शिक्षण उपसंचालक मान्यता प्रत मुळ उपलब्ध नसून सदरच्या झेरॉक्स प्रतीबाबत सर्वस्वी मी व संस्था हमी देते.

मुख्याध्यापिका

स्थळ ः- वाघोली

मुख्याध्यापिका
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
प्राथमिक विद्यालय, वाघोली
पुणे-४१२ २०७